अव्वल मुकदम्यात हुकूमनामा
ऑर्डर २०, कानू ६.७ फॉर्म अ१ पुरवणी ६, परिशिष्ट१)

दिवाणी अ ३७ म

# तडजोड हुकूमनामा

## सावंतवाडी येथील मे. सह दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) यांचे कोर्टात

नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक ३३ सन २०२६
निशाणी क्रमांकः- १७

अर्चना प्रशांत सावंत भोसले,
वय सु. ४४ वर्षे, धंदा - गृहिणी,
रा. घर नं. ५७२, भोमवाडी, कोलगाव,
ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग. } **वादी**

**विरूध्द**

अभिजीत अंकुश नार्वेकर,
वय सु. ४३ वर्षे, धंदा - शेती,
रा. घर नं. ८९९, पूर्णिमा निवास, माजगाव,
ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग } **प्रतिवादी**

------------------------------------------------

दावा दाखल दिनांक **२** माहे मार्च सन २०**२६**
**दावा फैल दिनांक २ माहे मार्च सन २०२६**

------------------------------------------------

**हक्कप्रस्थापना होवून मिळण्यासाठी दावा रुपये १०००/-.**

**वादीचा दावा असा की,**

१) गांव मौजे माजगाव, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदूर्ग येथील स्थावर मिळकतीस सर्व्हेवर्णन वगैरे तपशिल असा की,

| **भुमापन क्रमांक व उपविभाग** | **क्षेत्र ( चौ मीटर) बिनशेती** | **आकार (रू. पै.)** |
|---|---|---|
| ८२/ब१ | ५-००-०० | ५०-०० |

पैकी हे आर १-००-०० चौ. मीटर म्हणजेच एक गुंठे क्षेत्र या दाव्याचा विषय असून या दाव्यासोबत जोडलेल्या नकाशात सदरचे क्षेत्र A, B, C, D, E, F ते A अशा इंग्रजी सज्ञाक्षरांनी लाल रंगाने दर्शविलेले असून त्यास यापुढे सदर दाव्यात दावा विषयक जमिन असे संबोधिले आहे. सदरचा नकाशा या दाव्याचा एक भाग समजावयाचा आहे.

२) दावा जमिन प्रतिवादीच्या सामाईक मालकी कब्जाभोग्याची जमिन असून दावा जमीनीच्या सातबारास प्रतिवादीसहीत प्रतिवादीचा सख्खा भाऊ अनिकेत अंकुश नार्वेकर व सख्खी बहिण पूर्णिमा श्रीकृष्ण राउत पूर्वाश्रमीची पूर्णिमा अंकुश नार्वेकर यांच्या नावाची नोंद नमुद आहे. दावा जमिनीस लागून वादीच्या मालकीची सर्व्हे नं. ८२/ब२ ही जमिन आहे. दावा जमिनीमध्ये प्रतिवादीचे हे आर ००-०१-६० गुंठे क्षेत्र येते त्यापैकी हे आर १-००-०० चौ. मीटर म्हणजेच एक गुंठे दावा जमिनीच्या क्षेत्रात वादी सन २०११ सालापासून म्हणजेच सुमारे १४ वर्षाहून अधिककाळ वहिवाट व कब्जा करत होती व आहे. वादीची अशाप्रकारे दाव्याचा विषय असलेल्या क्षेत्रामध्ये सुमारे १४ वर्षाहून अधिककाळापासून प्रतिवादीसह अन्य सर्व संबंधीतांच्या जाणिवेने प्रतिवादीचा दावा मिळकतीच्या क्षेत्रामधील मालकी हक्क झुगारून सतत व अव्याहतपणे मालक म्हणून वहिवाट सुरू होती व आहे. अशाप्रकारे दावा मिळकतीत वादी यांचा शांततापूर्वक, अखंड व विनाहरकत कब्जा व वहिवाट प्रतिवादीच्या जाणिवेने चालू होती व आहे. सबब, वादी दावा जमिनीची विरुध्द कब्जाने (Adverse Possession) ने मालक झालेली आहे.

३) अशी परिस्थिती असताना, तारीख ०२/११/२०२५ रोजी पासून प्रतिवादीने दावा जमिनीतील वादीच्या हक्काबाबत प्रश्न उपस्थित केले. त्यामुळे वादीस दावा जमिनीची ती विरुद्ध कब्जाने मालक आहे असा हक्कप्रस्थापनेचा ठराव होवून मिळणेकरिता प्रस्तुतचा दावा दाखल करावा लागत आहे. वादीने दावा जमिनीबाबत प्रतिवादींविरुद्ध सावंतवाडी येथील दिवाणी न्यायालयात रे.दि.मु.नं. १३८/२०२५ हा दावा दाखल केला असून सदरचा दावा वादीस चालवावयाचा नसल्याने दावा मागे घेण्यासाठी वादीने तारीख २५/०२/२०२६ रोजी दावा मागे घेण्याबाबत पुरशीस दिलेली आहे.

४) **दाव्यास कारण** : तारीख ०२/११/२०२५ रोजी पासून प्रतिवादीने दावा जमिनीतील वादीच्या हक्काबाबत प्रश्न उपस्थित केले त्यावेळी घडले असून त्यावेळेपासून सतत आजतागायत घडत आलेले आहे. वादी या कोर्टहद्दीत राहणारी असून दावा जमिन या कोर्ट हद्दीतील असल्याने व दाव्यास कारण या कोर्टहद्दीत घडल्याने हा दावा चालविण्याचा या मे. कोर्टास पूर्ण अधिकार आहे.

५) **दाव्याचा आकार व तपशिल**

रु.१०००/- याप्रमाणे आकार हक्कप्रस्थापनेसाठी केलेला असून असून त्यास ठराविक कोर्ट फी स्टँप रु. २००/- चा लावून दिलेला आहे.

**एकुण रु. १०००/-** याप्रमाणे आकार, कोर्ट फी, वकील फी व कोर्ट अधिकार यासाठी केलेला आहे.

६) वादीची विनंती अशी की,

अ) वादीचा दावा मंजूर करण्यात यावा.

ब) वादी ही गाव मौजे माजगाव, ता. सावंतवाडी येथील भूमापन क्र. व उपविभाग ८२/ब१ या जमीनीतील दावा विषयक जमीनीची विरुद्ध कब्जाने मालक आहे असा हक्कप्रस्थापनेचा ठराव करून मिळावा.

क) या दाव्यात दुरुस्ती करावयाची झाल्यास तशी सवड व परवानगी वादीस मिळावी.

ड) न्यायपूर्ततेसाठी न्यायाचे जरुर ते सर्व हुकुम वादीच्या बाजूने व्हावेत.

येणेप्रमाणे पूर्ण फैसल्ला करण्यात येवून वादीस पूरी व परिणामकारक दाद मिळवून देण्यात यावी अशी विनंती आहे. सोबत फेरीस्ताप्रमाणे कागदपत्र व ॲफिडेव्हीट आहे.

**आज दिनांक १४ माहे मार्च सन २०२६ रोजी पॅनल प्रमुख श्रीमती जे.एम.मिस्त्री दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), सावंतवाडी यांचे समोर वादी व त्यांचे वकील हजर त्यांचे समक्ष, प्रतिवादी व त्यांचे वकील हजर त्यांचे समक्ष अखेर निकालासाठी मुकदमा निघाल्यावरुन खालीलप्रमाणे आदेश करणेत येत आहे.**

**-:: ORDER ::-**

1. The Suit is disposed of in view of compromise pursis vide Exh. 15.
2. Decree be drawn up to terms of compromise pursis (Exh. 15).
3. The compromise pursis (Exh.15) be part and parcel of compromise decree.
4. Court fees be refunded to the plaintiff as per rule.
5. Proceeding is closed.

ब नि. ९५

**सावंतवाडी यथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब यांचे कोर्टात**

रे. दि. मु. नं. ३३/२०२६

**अर्चना प्रशांत सावंत भोसले** ---- **वादी**

वि.

**अभिजीत अंकुश नार्वेकर** ---- **प्रतिवादी**

वादी-प्रतिवादी यांची एकत्रित आपसात तडजोड पुरशीस अशी की,

वादी व प्रतिवादीमध्ये आपसात तडजोड झालेली असून त्याच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे -

"१) वादी ही गाव मौजे माजगाव, ता. सावंतवाडी येथील भूमापन क्र. व उपविभाग ८२/ब१ या जमीनीतील दाव्यासोबत जोडलेल्या नकाशात A, B, C, D, E, F ते A अशा इंग्रजी सज्ञाक्षरांनी दर्शविलेल्या हे-आर १-००-०० चौ.मीटर या दावा विषयक जमीनीची विरुद्ध कब्जाने मालक आहे असा हक्कप्रस्थापनेचा ठराव प्रतिवादी मान्य करीत आहेत.

२) दावा जमिनीच्या सातबारास भोगवटदार सदरी वादीच्या नावाची नोंद करण्याचे प्रतिवादी मान्य करीत आहेत.

३) दाव्याचा खर्च दोन्ही पक्षकारांनी आपापला सोसावयाचा आहे."

वरील याप्रमाणे अटी नुसार वादी व प्रतिवादीं मध्ये आपसात तडजोड झालेली आहे म्हणून दिली पुरशीस.

तारीख - /३/२०२६

ॲड. राजेश मनोहर कुडतरकर

वादीतर्फे वकील

वादी- **अर्चना प्रशांत सावंत भोसले**

Plaintiff, Deft & defendant & their respective ld. Adv. present. Parties admitted terms & conditions of their compromise, compromise pursis is read & [illegible]

14/3/26

Panel Head

Adv. S. J. Sawant

ॲड. सिद्धी विनायक परब
प्रतिवादीतर्फे वकील

प्रतिवादी- **अभिजीत अंकुश नार्वेकर**
तर्फे कु अ **प्रशांत प्रभाकर सावंत भोसले**

**मे. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सावंतवाडी यांचे न्यायालयात**
**नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक ३३/२०२६ निकाल तारीख १४/०३/२०२६**
**निशाणी क्रमांक १७ लगत खर्चाचा आकडा**

| अ.क्र. | वादीला झालेला खर्च | रुपये | पैसे | अ.क्र. | प्रतिवादीला झालेला खर्च | रुपये | पैसे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | फिर्याद अर्जास स्टॅम्प – | २०० | ०० | १ | वजावटीला किंवा विरुद्ध दाव्यास स्टॅम्प | ०० | ०० |
| २ | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प -- नि.२ प्रत्येकी रु.१० प्रमाणे | १० | ०० | २ | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प - नि. १० प्रत्येकी रु. १० प्रमाणे | १० | ०० |
| ३ | दाखल झालेल्या कागदास स्टॅम्प – नि. ५, ६ प्रत्येकी रु. ५ प्रमाणे. | १० | ०० | ३ | दाखल झालेल्या कागदास स्टॅम्प - | ०० | ०० |
| ४ | भत्ता | ०० | ०० | ४ | भत्ता | ०० | ०० |
| ५ | फिर्यादीतील दाव्यावरील प्लीडराची फी - रुपये १००० /- वर १५०/- | ४५ | ०० | ५ | फिर्यादीतील दाव्यावरील प्लीडराची फी | ४५ | ०० |
| ६ | प्रोसेस लागू करणे - | ०० | ०० | ६ | प्रोसेस लागू करणे | ०० | ०० |
| ७ | तहकुबीबद्दल दिलेला - प्रत्येकी रु. १० प्रमाणे | ०० | ०० | ७ | तहकुबीबद्दल दिलेला - प्रत्येकी रु. १० प्रमाणे. | ०० | ०० |
| ८ | इतर अर्ज - प्रत्येकी रु. ५ प्रमाणे. | ०० | ०० | ८ | इतर अर्ज – नि. ९ प्रत्येकी रु. ५/- प्रमाणे | ०५ | ०० |
| | **एकूण** | २६५ | ०० | | **एकूण** | ६० | ०० |
| | **न दिलेला खर्च** | | | | **न दिलेला खर्च** | | |
| १ | न्यायालयीन शुल्क परतावा | २०० | ०० | १ | न्यायालयीन शुल्क परतावा | ०० | ०० |
| २ | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प - | ०० | ०० | २ | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प | ०० | ०० |
| ३ | तहकुबीबद्दल दिलेला - (वरील अ.क्र. ७ प्रमाणे ) | | ०० | ३ | तहकुबीबद्दल दिलेला - (वरील अ.क्र. ७ प्रमाणे ) | ०० | ०० |
| | **एकुण** | ०० | ०० | | **एकुण** | ०० | ०० |
| | **बाकी** | ६५ | ०० | | **बाकी** | ६० | ०० |
| | **पूर्णांकात** | ६५ | ०० | | **पूर्णांकात** | ६० | ०० |

**आज तारीख १४ माहे मार्च सन २०२६ रोजी आमच्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**

**तयार करणार**
**(एस.ए.शिंदे)**
**क.लिपिक**

तपासले बरोबर आहे.
**(ए.एस.छजलाने)**
क.लिपिक

३१-३/२०२६
**(श्रीमती आर.जी.कुंभार)**
**सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),**
**सावंतवाडी**

वादीतर्फे वकील - श्री. आर.एम. कुडतरकर सही करणेस गैरहजर
प्रतिवादी तर्फे वकील - श्री. एस. व्ही. परब सही करणेस गैरहजर

**(ह्या मुकदम्यातील पक्षकाराना अशी ताकीद देणेत येते की, त्यांनी हजर केलेले कोणतेही दस्तऐवज जर ते परत नेले नाहीत तर अपील झाले असल्यास अपिलाचा निकाल झाल्यावर रेकॉर्ड नाश करणेच्या प्रचलित नियमास अनुसरुन नाश करुन टाकणेस पात्र होतील.)**